**<u>प्रतिवादी क्र. १, २, ४, ८, १० व ११ तर्फे विधिज्ञ श्री.ए.एस. देऊसकर यांचेमार्फत साक्षीदाराचा उलटतपास शपथेवर सुरु</u> –**

माझे शिक्षण दहावीपर्यंत झालेले आहे. मी मौजे तळवडे या गावी पूर्वीपासून राहतो. हे म्हणणे खरे आहे की, मी दावा मिळकतीसंदर्भात संपूर्ण माहिती घेवून सदरचा दावा दाखल केलेला आहे. मला एक भाऊ व तीन बहिणी आहेत. त्यांची नावे संदीप जगन्नाथ साळगांवकर,सुवर्णा श्रीधर केरकर, ऐश्वर्या अवधूत बुगडे व भागिरथी बाबु गोवेकर अशी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी भागिरथी हिला दाव्याचे कामी पक्षकार केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, गंगावती लक्ष्मण साळगांवकर या देखील दावा मिळकतीपैकी एका मिळकतीच्या भागीदार आहेत. गंगावती लक्ष्मण साळगांवकर यांना तीन मुले व तीन मुली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी दावा दाखल करतेवेळेस गंगावती साळगांवकर व तिच्या मुलांना दाव्याचे कामी समाविष्ट केलेले नाही. गंगावती साळगावंकर व आमचे एकत्र कुटुंब असलेमुळे मी तिला या दाव्याचे कामी समाविष्ट केलेले नाही.

हे म्हणणे खरे आहे की, तळवडे कुंभारवाडा श्री देव रामचंद्र लक्ष्मण सिता हे देवस्थान आहे. हे म्हणणे खरे नाही की, या देवस्थानच्या तळवडे गावी खाते क्र. ९७१ ने मिळकती आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकती या देवस्थानच्या मालकीच्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकती या देवस्थानने प्रतिवादी क्र. १ ते ११ यांना सांभाळ करणेसाठी दिलेल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये माझी वाडवडिलांपासून कब्जे वहिवाट असलेचे मी खोटे सांगत आहे.

**(प्रतिवादीतर्फे विधिज्ञ यांनी उर्वरित उलटतपास घेणेस तोंडी मुदत मागणी केली. प्रतिवादीतर्फे विधिज्ञ यांची मागणी मान्य करणेत आली. सबब,उलटतपास पुढील तारीखेपर्यंत तहकूब.)**

सही/-

(दुर्गा प्र.पुजारी)

दि.१२/१२/२०२३. दिवाणी न्यायाधीश,(क.स्तर),सावंतवाडी.